# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२२–२३/२४ अति महत्त्वाचे व कालमर्यादेचे स्मरणपत्र–३ / अंतिम सुचना दि. १७/०४/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : केंद्र हिस्सा योजना (**C.S.S.**) अंतर्गत केंद्रीय नोडल अकाऊंट (**C.N.A**) द्वारे रासेयो सहायक अनुदान निधी वितरणाची अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय स्तरावर **Z.B.S.A. (Zero Balance Subsidiary Account) (Current Account)** खाते **SBI** च्या शाखेमध्ये उघडुन **PFMS** ला मॅपींग करणेबाबत

संदर्भ : १.रासेयो/२०२२–२३/९०७,दि.०९/०१/२०२३ चे रासेयो परिपत्रक
http://collegecirculars.unipune.ac.in/sites/documents/NSS%20Circulars/C.N.A.Final%20Circular_c_19012023.pdf
२.रासेयो/२०२२–२३/९७८,दि.०३/०३/२०२३ चे रासेयो परिपत्रक
http://collegecirculars.unipune.ac.in/sites/documents/NSS%20Circulars/ZBSA-PFMS-Maping_03032023.pdf

महोदय,

उपरोक्त विषयानुसार मा. अवर सचिव, युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, युवा कार्य विभाग, रासेयो कक्ष, नवी दिल्ली आणि मा. राज्य संपर्क अधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांनी कळविल्यानुसार सन २०२२–२३ या वर्षापासून रासेयो करिताचा सहायक अनुदान निधी वितरणाची अंमलबजावणी ही केंद्र हिस्सा योजना अंतर्गत केंद्रीय नोडल अकाऊंट (C.N.A) द्वारे करणेबाबत वरिल संदर्भिय परिपत्रकान्वये यापूर्वीच सूचित करण्यात आले होते.

त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रासेयो संलग्नित पुणे, अहमदनगर व नाशिक मधील रासेयो नियमित एकक मंजुर असलेल्या महाविद्यालयांनी (रासेयो स्वयंनिर्वाही एकक महाविद्यालये वगळुन) विषयांमध्ये नमूद केलेल्या सुधारीत कार्य पध्दतीकरिता नव्याने भारतीय स्टेट बॅकेच्या नजीकच्या शाखेमध्ये Z.B.S.A. (Zero Balance Subsidiary Account)(Current Account) खाते उघडण्याबाबत वरिल संदर्भिय पत्रानुसार व रासेयो कार्यक्रम अधिकारी WhatsApp Group द्वारे कार्यक्रम अधिकारी यांना वांरवार सुचना दिल्या होत्या. अद्यापही ज्या महाविद्यालयानी हे खाते उघडलेले नाही. त्या संबधीत महाविद्यालयांनी Z.B.S.A. (Zero Balance Subsidiary Account)(Current Account) खाते पुढील दोन दिवसात उघडुन त्याबाबतची माहिती **https://forms.gle/Ug8zFdj5DxVuuyRy9** या गुगल फॉर्म मध्ये दि. २० एप्रिल २०२३ पर्यंत कळवावी.

**खाते उघडण्याबाबत महाविद्यालयांकडून दिरंगाई झाली अथवा खाते उघडले नाही तर यांची सर्व जबाबदारी संबधित महाविद्यालयांची राहील आणि संबधित महाविद्यालयांचे सन २०२२–२३ करिता नियमित** कार्यक्रम व विशेष शिबिराचे अनुदान अदा करणे शक्य होणार नाही. तसेच सन २०२३–२४ या वर्षापासुन संबधीत महाविद्यालयाची एकक मान्यता रद्द करण्यात येईल यांची नोंद घ्यावी. खाते न उघडलेल्या महाविद्यालयांना ही अंतीम सुचना असेल, कळावे, ही विनंती.

(स्वाक्षरी)

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

टिप:ज्या महाविद्यालंयाना स्वयंनिर्वाही एकक मंजूर आहे. त्या महाविद्यालयांनी सदर खाते उघडणे आवश्यक नाही.

**महाराष्ट्र शासन**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : रासेयो-२०२२/प्र.क्र.१५५/साशि-७
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,
३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-१.
Email: nssmantralaya@gmail.com
दिनांक :- ११ एप्रिल, २०२३.

<u>तात्काळ / अति महत्त्वाचे</u>

प्रति,
कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. मुंबई विद्यापीठ, मुंबई.
३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
४. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
६. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.
७. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
८. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
९. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, रायगड.
११. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
१२. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी.
१३. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
१४. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, +२ स्तर, पुणे.

**विषय :- रासेयो एकक महाविद्यालयांनी Central Nodal Account [C.N.A.] अंतर्गत Z.B.S.A. खाते तातडीने उघडणेची कार्यवाही पूर्ण करणेबाबत ...**

केंद्र शासनाच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील दि. ३०.१२.२०२२ रोजीच्या ई-मेल संदेशानुसार व या कार्यासनाकडील दि. २ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार, राज्यातील शासन अनुदानीत विविध विद्यापीठे/+२ संचालनालये आणि त्यांचे अधिनस्त असलेल्या रासेयो एकक महाविद्यालयांना Central Nodal Account [CNA] अंतर्गत Z.B.S.A. खाते नजीकच्या भारतीय स्टेट बँकेच्या शाखेमध्ये उघडण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. या प्रकरणी वारंवार आपणांस सूचना देण्यात येऊन देखील व दि.३१ मार्च, २०२३ अखेर जवळपास ३ महिन्यांचा कालावधी लोटला तरी देखील आपले विद्यापीठाच्या अधिनस्त असलेल्या सर्वच रासेयो एकक महाविद्यालयांनी ZBSA खाते अद्यापी उघडले नसल्याची बाब निदर्शनास येत असून ही बाब निश्चीतच खेदजनक आहे व आपणाकडून देखील सदरील बाब गांभीर्याने घेतली नसल्याचे स्पष्ट होत आहे.

युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडील दि. १०.०४.२०२३ रोजीच्या ई-मेल संदेशान्वये असे कळविण्यात आले आहे की, ज्या रासेयो एकक महाविद्यालयांनी अद्यापी ZBSA खाते उघडलेले नाही, त्यांनी त्यांचे नजीकच्या भारतीय स्टेट बँकेच्या शाखेमध्ये तातडीने ZBSA [ Zero Balance Subsidiary Account] खाते उघडण्याची कार्यवाही दि. २०.०४.२०२३ पूर्वी वा पर्यंत पूर्ण करावी. तसेच ZBSA खाते उघडल्यानंतर संबंधित रासेयो एकक महाविद्यालयांनी सदरील नवीन खात्याचा तपशिल PFMS प्रणालीमध्ये mapping करावा. विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या mapping request तातडीने approved करुन विद्यापीठांनी संबंधित रासेयो एकक महाविद्यालयांना Agency mapping या पर्यायामध्ये add agency करण्याची कार्यवाही दि. २५.०४.२०२३ पूर्वी वा पर्यंत पूर्ण करावी.

याद्वारे संबंधित विद्यापीठाच्या रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांना सूचित करण्यात येते की, आपले अधिनस्त असलेल्या सर्वच रासेयो एकक महाविद्यालयांनी Z.B.S.A. खाते उघडण्याची कार्यवाही १०० टक्के पूर्ण करावी आणि १०० टक्केच्या प्रमाणात सर्वच रासेयो एकक महाविद्यालयांना Agency mapping या पर्यायामध्ये add agency करण्याची कार्यवाही पूर्ण करुन तसा अहवाल खालील नमुन्यात या कार्यासनास दि. २५.०४.२०२३ रोजी वा पर्यंत nssmantralaya@gmail.com सादर करावा.

| अ.क्र. | विद्यापीठ / +२ संचालनालयाचे नांव | अधिनस्त रासेयो एकक महाविद्यालयांची एकूण संख्या | ZBSA खाते उघडलेल्या रासेयो एकक महाविद्यालयांची एकूण संख्या | Agency mapping केलेल्या रासेयो एकक महाविद्यालयांची एकूण संख्या (याकरीता PFMS मधील स्क्रीनशॉट सोबत देण्यात यावा.) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

विषयांकीत प्रकरणी या कार्यासनाकडून सातत्याने आपणांस कळविण्यात आलेले असून देखील आपले अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांचे ZBSA खाते उघडण्यात आले नसल्याने भविष्यात याप्रकरणी काही आर्थिक अडचणी उद्भवल्यास त्याकरीताची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित महाविद्यालय तसेच आपले विद्यापीठाची राहील, याची नोंद घ्यावी.

Rameshwar 11-4-23

(डॉ. रामेश्वर रा.कोठावळे)
राज्य संपर्क अधिकारी/वि.का.अ.
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१. मा. प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : रासेयो-२०२२/प्र.क्र.१५५/साशि-७
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,
३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-१.
Email: nssmantralaya@gmail.com
दिनांक :- १७ एप्रिल, २०२३.

तात्काळ / अति महत्त्वाचे

प्रति,
कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सर्व विद्यापीठे/+२ संचालनालये, महाराष्ट्र राज्य.

**विषय :-** **सन २०२२-२३ या वर्षातील प्रत्यक्ष खर्चाच्या अनुषंगाने PFMS प्रणालीमधून eppa द्वारे प्राप्त झालेला निधी व उर्वरित आवश्यक निधीची माहिती सादर करणेबाबत ...**

केंद्र शासनाच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील दि. ३०.१२.२०२२ रोजीच्या ई-मेल संदेशानुसार व या कार्यासनाकडील दि. २ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार, राज्यातील शासन अनुदानीत विविध विद्यापीठे/+२ संचालनालये आणि त्यांचे अधिनस्त असलेल्या रासेयो एकक महाविद्यालयांना Central Nodal Account [CNA] अंतर्गत Z.B.S.A. खाते नजीकच्या भारतीय स्टेट बँकेच्या शाखेमध्ये उघडण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार मार्च २०२३ अखेर रासेयो एकक महाविद्यालयांनी zbsa खाते उघडून मॅपिंग केल्यानंतर त्या महाविद्यालयांची विनंती संबंधित विद्यापीठाने मान्य केली व त्या महाविद्यालयाला AGENCY MAPPING मध्ये ADD AGENCY म्हणून समाविष्ट केले होते, अशा सर्व संबंधित महाविद्यालयांना सन २०२२-२३ या वर्षाकरीताचा निधी PFMS प्रणालीद्वारे खर्च करण्यासाठी ONLINE पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आला व त्यापैकी बहुतांश रासेयो एकक महाविद्यालयांनी उपलब्ध झालेला निधी PFMS प्रणालीमधील EPPA द्वारे प्राप्त केला आहे.

दि. १२.०४.२०२३ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे झालेल्या आढावा बैठकीमध्ये याप्रकरणी सविस्तर चर्चा करण्यात आली असून ज्या रासेयो एकक महाविद्यालये अदयापी ZBSA खाते उघडलेली नाहीत, अशा महाविद्यालयांनी तातडीने नजीकच्या SBI शाखेत ZBSA खाते उघडण्याची कार्यवाही पूर्ण करावी व अशा महाविद्यालयांकडील mapping request संबंधित विद्यापीठांनी तातडीने approved करुन agency mapping मध्ये add agency ची कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत.

तसेच सन २०२२-२३ या वर्षामध्ये रासेयो नियमित उपक्रम व विशेष शिबिराच्या अंमलबजावणी करीता झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या रक्कमांपैकी ज्या महाविद्यालयांना PFMS मधून eppa द्वारे काही निधी प्राप्त झाला व काही महाविद्यालयांना तो प्राप्त झाला नाही, अशा सर्व रासेयो एकक महाविद्यालयांच्या झालेल्या एकूण खर्चाची माहिती **सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील** MS-Excel Sheet **मध्ये** Times New Roman Font, Font size-**१२** भरुन या कार्यासनास सादर करण्यात यावी. सदरहू माहिती भरताना प्रथमत: संबंधित विद्यापीठाचा प्रशासकीय खर्च (रुपये ४०/- प्रति विद्यार्थी याप्रमाणे) नियमित उपक्रमाच्या रकान्यामध्ये नमूद करण्यात यावा. तदनंतर आपले अधिनस्त असलेल्या रासेयो एकक महाविद्यालयांनिहाय माहिती भरण्यात यावी. अहवाल तयार करताना दिलेल्या विहीत नमुन्यात कोणत्याही प्रकारचा बदल कोणीही कृपया करु नये.

याद्वारे राज्यातील सर्व संबंधित विद्यापीठाच्या रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त असलेल्या सर्वच रासेयो एकक महाविद्यालयांकडील याबाबतची माहिती संकलीत करुन विद्यापीठाने याबाबतचा एकत्रित अहवाल दिलेल्या विहीत नमुन्यात या कार्यासनास दि. २१.०४.२०२३ रोजी वा पर्यत nssmantralaya@gmail.com वर soft copy द्वारे सादर करावा.

विषयांकीत प्रकरणी आपले विद्यापीठाकडून मागविण्यात आलेली माहिती या कार्यासनास वेळीच प्राप्त न झाल्यास व पर्यायाने राज्याकडून केंद्रास सादर करावयाच्या माहितीमध्ये आपले विद्यापीठाच्या मागणी निधीचा समावेश न झाल्यास, सन २०२२-२३ या वर्षाकरीताच्या निधी उपलब्ध होणेकामी भविष्यात काही अडचणी उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही आपले विद्यापीठाची व आपले अधिनस्त असलेल्या संबंधित महाविद्यालयांची राहील, याची नोंद घ्यावी.

Rameshwar
17-4-23

(डॉ. रामेश्वर रा.कोठावळे)
राज्य संपर्क अधिकारी/वि.का.अ.
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१. मा. प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**Information for Actual amount received through eppa by University and College level and remaining amount to be received against actual expenditure made during the year 2022-23 by University and College level.**

| Sr.No. | Name of University/+2 Council or Name of Colleges/Schools | Allocation of NSS Volunteers | | Entitlement for the year 2022-23 | | Actual Expenditure made during the year 2022-23 | | Amount actually received through eppa | | Remaining amount to be received | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Regular | Special | Regular@ 400 | Special@ 700 | Regular | Special | Regular | Special | Regular | Special |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | | | | | | | |

Signature of .P.C/P.O. NSS
Name of University / College/School